MHTH170005762022

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | २४.०२.२०२२ |
| नोंदणी तारीख | : | २४.०२.२०२२ |
| निकाल तारीख | : | १४.०७.२०२६ |
| कालावधी | : | वर्षे महिने दिवस<br>०४ ०४ २० |

**पालघर येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, यांचे न्यायालयात**

(पिठासन अधिकारी – श्रीमती. पी. एच. अहिरे)

**नियमीत फौजदारी खटला क्र. १४८/२०२२**

**निशाणी क्र.**

गुन्हा नोंद क्र.५६/२०२२

**फिर्यादी/तक्रारदार** **महाराष्ट्र शासन,**
मनोर पोलीस स्टेशन,
ता.जि. पालघर

**अभियोग पक्षातर्फे** सहाय्यक सरकारी अभियोक्ता
श्री. पी. आर. ठाकरे

**आरोपी** **रणधिर महेश ठाकूर,**
वय – ४१ वर्षे
राहणार – सायलेंट हॉटेल, मनोर, ता.जि.पालघर
मुळ रा. ग्राम दहिबत, ता. पंडौल, जि. मधुबनी,
राज्य–बिहार.

**आरोपीतर्फे विधीज्ञ** श्री. चंदन किणी व श्रीमती एस. एस. सावंत

**भाग – ब**

फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छे ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | २३.०२.२०२२ |

| | | |
|---|---|---|
| फिर्याद दाखल दिनांक | :- | २३.०२.२०२२ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :- | २४.०२.२०२२ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | :- | ०३.०२.२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :- | १५.०२.२०२५ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :- | १२.०६.२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | :- | ०६.०७.२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :- | --- |

**आरोपीची माहिती**

| अ. क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अतिंम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (set off) करण्याबाबत कलावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | रणधिर महेश ठाकूर | २३.०२.२०२२ | २४.०२.२०२२ | भा.दं.वि. कलम ३५४, ५०४ प्रमाणे | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |

**भाग – क**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**सरकारपक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/ न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोगपक्ष –**

| **सा.क्र.** | **साक्षीदाराचे नांव** | **स्वरुप** | **निशाणी** |
|---|---|---|---|
| १. | कविता प्रशांत दास | फिर्यादी | ०७ |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | हरेश प्रकाश पाटील | पंच | ११ |
| ३. | रविंद्र मधुकर धडपी | साक्षीदार | १३ |
| ४. | संदेश प्रकाश पाटील | साक्षीदार | १७ |
| ५. | रिजवाना लालसाब ककेरी | तपासी अधिकारी | २१ |

**ब. आरोपीतर्फे साक्षीदार**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| -- | -- | -- | -- |

**क. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | ८ | फिर्यादी जबाब |
| २. | ९ | फिर्याद |
| ३. | १० | घटनास्थळावरील फोटो |
| ४. | १२ | घटनास्थळ पंचनामा |
| ५. | २२ | अटकेचा पंचनामा |
| ६. | २३ | भा.पु.कायदा ६५-ब नुसार प्रमाणपत्र |

## न्यायनिर्णय

## (घोषणा तारीख- १४.०७.२०२६)

प्रस्तूत खटला आरोपी विरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३५४, ५०४ या अपराधासाठी दाखल आहे.

**अभियोगपक्षाची हकिकत थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.**

२. दिनांक २३.०२.२०२२ रोजी नेहमी प्रमाणे सकाळी ०७.०० वाजताच्या सुमारास फिर्यादीने त्यांची टपरी चालू केली होती. ती असे कथन करते की,

तिचे पती दुपारी ०१.३० वाजताच्या सुमारास बिगारीच्या कामासाठी गेल्याने ती एकटीच टपरी चालवत होती. तिने कथन केले की, सायलेंट रिसॉर्टमध्ये काम करणारा इसम नेहमी त्यांच्या टपरीत चहा नाश्ताकरिता येत जात होता त्यामुळे ती त्यास ओळखते परंतु तिला त्या इसमाचे नाव गाव माहित नाही. ती पुढे कथन करते की, घटनेच्या दिवशी तो इसम दुपारी ०३.३० वाजताच्या सुमारास ती टपरीमध्ये एकटीच असताना आला व म्हणाला की, 'तुझा नवरा भैय्या आहे, तो काही कामाचा नाही, तू तूझ्या नव–याला सोडून दे आणि माझ्या सोबत चल, मी तुला राणी सारखे ठेविन' त्यावर फिर्यादीने त्यास तू येथे थांबू नको निघून जा असे सांगितले असता त्या इसमाने फिर्यादीचा हात पकडून जवळीक साधण्याचा प्रयत्न करून चुंबन घेण्याचा इशारा केला व फिर्यादीला मिठी मारून तिच्या मनात लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. त्यानंतर फिर्यादीने त्यास ढकलून दिले असता तो टपरीच्या बाहेर जावून फिर्यादीला शिवीगाळ करू लागला त्यावेळी फिर्यादीने तिचा भाऊ रविंद्र यास फोन केल्यानंतर तिचा भाऊ तेथे आल्यावर तो इसम टपरीतून पळून गेला. त्यानंतर फिर्यादीच्या भावाने त्याचा पाठलाग करून त्याला थांबवून त्यास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव रणधीर ठाकूर, राहणार सायलेंट हॉटेल असे सांगितले. म्हणून यावरून फिर्यादीने आरोपीविरुध्द पालघर पोलीस स्टेशनला रितसर तक्रार दिली.

३. सदरची फिर्याद गुन्हा रजिस्टर नंबर ५६/२०२२ ने नोंदविली. तपासी अधिकारी यांनी तपासादरम्यान घटनास्थळाचा पंचनामा केला, तपास टिपणे नोंदविले, आरोपीस अटक केली. गुन्ह्याचा तपास पूर्ण झाल्यानंतर न्यायालयात आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४. या प्रकरणात आरोपीविरुध्द (निशाणी ०६) भा.दं.वि कलम ३५४ व

५०४ अन्वये दोषारोप ठेवला व तो आरोपीस मराठीत वाचून व समजावून सांगितला असता त्यांनी त्यांचे वरील सर्व आरोप नाकारले व सुनावणीला सामोरे जाण्याची तयारी दर्शवली. आरोपीने असा बचाव घेतला की, फिर्यादीने खोटी केस केली आहे.

५. सदर प्रकरणामध्ये अभियोग पक्षाने निशाणी २४ वर पुरावा बंदची पुरसीस दाखल केल्याने अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. अभिलेखावर आरोपी विरुध्द गुन्हादर्शक पुरावा आल्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ प्रमाणे निवेदन निशाणी २५ अन्वये नोंदविण्यात आले.

६. अभिलेख, पुरावे पाहता, सदर प्रकरणात निकालासाठी खालील मुद्दे निघतात, ते मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे काय, दिनांक २३.०२.२०२२ रोजी दुपारी ०३.३० वाजताचे सुमारास टेननाका ब्रिजच्या शेजारी फिर्यादीच्या नाश्ताच्या टपरीत आरोपीने फिर्यादीचा हात पकडून जवळीक साधण्याचा प्रयत्न करून चुंबन घेण्याचा इशारा केला व तिला मिठी मारून विनयभंग करण्याच्या उद्येशाने तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करुन विनयभंग करून तिच्यावर हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग केला व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधान संहितेचे कलम ३५४ अन्वये शिक्षापत्र असा अपराध केला? | ... **नकारार्थी** |
| २. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे काय, वर नमुद दिवशी, | ...**नकारार्थी** |

वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीकडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा अथवा एखादा अपराध घडावा या उद्देशाने त्यांना शिवीगाळ करुन प्रक्षोभित केले व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधान संहितेचे कलम ५०४ अन्वये शिक्षापत्र असा अपराध केला?

३. काय आदेश ? **अंतिम आदेशाप्रमाणे.**

## कारणमिमांसा

७. अभियोगपक्षातर्फे विधीज्ञ श्री.पी.आर.ठाकरे आणि आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. चंदन किणी व श्रीमती एस. एस. सावंत यांचा युक्तीवाद ऐकला. तसेच आरोपीतर्फे मा. उच्च न्यायालयाचे न्यायनिवाडे जसे की, *स्टेट ऑफ महाराष्ट्र वि. संदिप महादेव साळूंखे [AIROnline 2021 Bom 1210], हनुमानदास पांडूरंग राऊत वि. स्टेट ऑफ महाराष्ट्र [2012 (4) AIR Bom R 105], पंकज उर्फ रितेश विश्वनाथ बोदडे वि. स्टेट ऑफ महाराष्ट्र [AIROnline 2019 Bom 1829], अखिल इस्माईल पिंजारी वि. स्टेट ऑफ महाराष्ट्र [2019 (1) ABR (Cri) 607], गजानन बी. मेहेत्रे वि. स्टेट ऑफ महाराष्ट्र [2006(4) AIR Bom R18], संजय माधवराव सूर्यवंशी वि. स्टेट ऑफ महाराष्ट्र [2011 (4) AIR Bom R 122]* यांचे संदर्भ दाखल करण्यात आले आहेत.

### मुद्दा क्रमांक १ व २ करिता –

८. वर चर्चिल्याप्रमाणे व अभिलेखावर असलेल्या पुराव्याप्रमाणे हे तपासणे गरजेचे आहे की, आरोपींवरील गुन्हा सिद्ध करण्यासाठी अभियोग पक्षातर्फे आरोपी याने फिर्यादीचा हात पकडून जवळीक साधण्याचा प्रयत्न करून चुंबन घेण्याचा इशारा केला व तिला मिठी मारून विनयभंग करण्याच्या उद्येशाने तिच्या मनास लज्ञा उत्पन्न होईल

असे कृत्य केले या बाबी सिद्ध करणे आवश्यक आहे.

९. वरील दोन्ही मुद्दे हे परस्पर संलग्न असल्यामुळे तसेच पुराव्यातील वारंवारता टाळण्यासाठी त्याचे विवेचन एकत्रीतपणे केलेले आहे. सदर प्रकरणात फिर्यादी कविता प्रशांत दास (अ.सा.क्र.१) हिची साक्ष अभियोगपक्षास आरोपी विरुध्द गुन्हा शाबीत करण्यासाठी अत्यंत महत्वाची आहे.

१०. फिर्यादी कविता प्रशांत दास (अ.सा.क्र.१) यांनी त्यांच्या सरतपासात असे कथन केले आहे की, त्यांची टेननाका येथे मुंबई–अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गाच्या बाजूला चहा वडापावची टपरी असताना अंदाजे २ वर्षापूर्वी संध्याकाळच्या वेळी एक इसम तेथे आला व त्यांनी त्याला काय हवे असे विचारले असता, तो काही बोलला नाही आणि त्यांच्याकडे एकटक बघत राहिला, त्यामुळे "तुला काही नसेल लागत तर इथून निघुन जा" असे त्यांनी त्या इसमास सांगितले असता तो इसम त्यांना म्हणाला की, "तुम्ही मला पसंत आहात, आय लव्ह यु". त्यावरून, त्यांना चिड आली असता त्या इसमाने हाताने त्याच्या स्वतःच्या ओठाला हात लावून त्यांच्याकडे हात करून किस करण्याचा हवेत इशारा केला व टपरीच्या आतमध्ये येण्याचा प्रयत्न प्रयत्न करता असतानाच त्यांनी तेथे असलेली काठी उचलून त्याच्यावर उगारली व त्याला मारण्यास सुरूवात केली. त्यांनी पुढे असेही कथन केले की, सदर इसम हा खूप दारू पिलेला होता व तो टपरीवरून जात नव्हता त्यामुळे त्यांनी भावाला फोन करून बोलावले व त्यांचा भाऊ आल्यानंतर त्यानेही सदर इसमाला मारले. त्यानंतर त्यांनी मनोर पोलिस ठाणे येथे जाउन सदर इसमाविरूध्द फिर्याद (निशाणी ९) दाखल केली. त्यानंतर त्यांनी न्यायालयात हजर असलेल्या आरोपीकडे बोट दाखवून त्यानेच त्यांची छेड काढली असल्याचे कथन केले. त्यांनी पुढे कथन केले की, त्यांनी पोलिसांना घटनेच्या

दुसऱ्या दिवशी घटनास्थळ दाखविले. साक्षीदाराला घटनास्थळाचा फोटो दाखविण्यात आला असता त्यांनी तो ओळखला.

११. फिर्यादीने तिच्या उलटतपासात कथन केले की, आरोपी रणधिर ठाकुर घटनेच्या वेळी टपरी मध्ये आलेला नव्हता तसेच त्याने जवळ येउन त्यांना मिठी मारलेली नाही व त्यांच्या जवळ ही आलेला नाही. त्यांच्या कथनाप्रमाणे, सदर घटनेच्या वेळी टपरीवर इतर २ ते ३ इसम चहा पित होते, त्यांचे नावे त्यांना सांगता येणार नाहीत परंतु त्यांच्या बद्दल त्यांनी पोलीसांना सांगितले होते. त्यांच्या कथनाप्रमाणे, त्यांना हे आठवत नाही की त्यांनी पोलीसांनी जबाब देते वेळी असे सांगितले होते की, 'मी टपरीवर असताना सर्व गिऱ्हाईकांना नेहमीप्रमाणे विचारात असताना एक इसम त्यालाही काय हवे असे विचारले असता, तो काही नाही बोलला. तो माझ्याकडे एकटक बघत होता. त्यामुळे मी त्याला म्हणाले की, "तुला काही नसेल लागत तर इथून निघुन जा". तो मला म्हणाला की, "तुम्ही मला पसंत आहात." तो मला "आय लव्ह यु" असेही म्हणाला. त्यावरून मला चिड आली असता त्याने मला त्याच्या हाताने त्याच्या स्वत च्या ओठाला हात लावून माझ्याकडे हात करून किस करण्याचा इशारा हवेत केला.'' तसेच ''आरोपी रणधिर ठाकुर हा खूप दारू पिलेला होता'' सदर तथ्ये त्यांच्या फिर्यादीत का नाही याचे कारण त्या सांगू शकल्या नाहीत. तिने पुढे तिच्या उलटतपासात हे मान्य केले की, त्यांचा भाऊ टपरीवर आला होता त्यावेळेस रणधिर ठाकुर टपरीवर नव्हता.

१२. विशेष बाब म्हणजे पीडित साक्षीदार फिर्यादी हिने अशी कबुली दिली आहे की, आरोपी हा तिच्या जवळ आला नव्हता, त्याने मिठी मारलेली नाही. परंतु तिच्या सरतपासात तिने हे सांगितले आहे की, आरोपी तिच्याजवळ येण्याचा प्रयत्न करत

होता, तसेच तो टपरीच्या आत शिरण्याचा प्रयत्न करीत असताना तिने त्याला मारण्यास सुरुवात केली. सदर बाब पाहता, फिर्यादी हिच्या दोन्ही जबाबात तफावत दिसून येते व त्यावरून सदर गुन्हा घडला की नाही या बाबत संभ्रम निर्माण होतो.

१३. त्याअनुषंगाने पुढे फिर्यादीचा भाऊ रविंद्र मधुकर धडपी (अ.सा.क्र.३) यांनी त्यांच्या सरतपासात असे कथन केले आहे की, फिर्यादी ही त्यांची बहीण आहे. ते कथन करतात की, घटना दोन वर्षापूर्वीची असून ते घरी असताना त्यांना त्यांच्या बहीणीने फोन केला व सांगितले की, "एक माणूस दारू पिवून टपरीवर आला आहे व मला जबरदस्ती करत आहे तु ताबडतोब इकडे ये" त्यामुळे ते लगेच टपरीवर गेले असता एक इसम तिथून पळून जात असताना त्यांनी त्या इसमाला थांबवले. त्या इसमाला त्यांनी परत टपरीवर घेवून आणले व त्या इसमाला त्याच्या बहीणीने मारले. त्यानंतर ते त्या इसमाला घेवून मनोर पोलिस ठाणे येथे तक्रार नोंदविण्यासाठी गेले. त्यावेळी त्यांच्या बहीणीने त्यांना सांगितले की, सदर इसम तिच्या हाताला पकडून जवळ खेचत होता व जबरदस्ती करण्याचा प्रयत्न करत होता. साक्षीदाराने न्यायालयासमक्ष आरोपीला ओळखून सदर इसमाने त्यांच्या बहीणीला छेडून जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केला असल्यचे कथन केले. तसेच साक्षीदाराने घटनास्थळाचा पोलिसांनी काढलेला निशाणी १० वरील फोटो ओळखून तो तोच असल्याचे कथन केले आहे.

१४. सदर साक्षीदाराने उलटतपासात कथन केले की, आरोपी रणधिर ठाकुर याला ते सायलेंट रिसॉर्ट येथून पकडून चहाच्या टपरीवर घेउन गेले. तसेच त्यांनी संदेश पाटील आणि अरविंद जाधव यांना फोन करून बोलवले नव्हते त्यांच्या कथनाप्रमाणे घटनास्थळी गर्दी पाहून ते स्वतः तेथे आले होते. त्याने उलटतपासात असे

सांगितले की, फिर्यादीचा फोन आला असता तो ताबडतोब तिच्या चहाच्या टपरीवर गेला व त्याने आरोपी याला सायलेंट रिसॉर्ट येथून पकडून चहाच्या टपरीवर घेऊन गेला.

१५. त्यापुढे साक्षीदार क्र. ४ संदेश पाटील याची साक्ष पाहता त्याने असे कथन केले आहे की, घटनेच्या दिवशी साक्षीदार क्र. ३ रविंद्र याने त्यांना फोन करून घटनेबाबत सांगितले व घटनास्थळाजवळ येण्यास सांगितले व त्याप्रमाणे ते तिथे गेले. त्यांच्या साक्षीनुसार आरोपी व फिर्यादी यांचा वाद संपुष्टात आला होता व ते वाद झाल्यानंतर तिथे पोहचले होते. त्यावेळी तेथे आरोपी, रविंद्र धडपी तसेच फिर्यादी हजर होता परंतु त्यांनी कुठलीही चौकशी केली नाही व त्यानंतर ते त्यांच्यासोबत पोलीस स्टेशनला गेले होते. त्यांनी त्यांच्या उलटतपासात हे मान्य केले की त्यांनी घटना प्रत्यक्ष पाहिली नाही. ते फिर्यादीच्या भावाला चांगलेच ओळखतात. सदर प्रकरणात चूक कोणाची आहे हे त्यांना सांगता येणार नाही. साक्षीदार क्र. ४ यांच्या पुराव्यानुसार ते फिर्यादीचे भाऊ साक्षीदार क्र. ३ यांना ओळखतात, तसेच घटना प्रत्यक्ष न पाहिल्यामुळे चूक कोणाची आहे हे ते सांगू शकत नाही. तसेच फिर्यादी हे त्यांच्या परिचयाचे आहेत.

१६. साक्षीदार क्र. ३ व ४ यांची साक्ष पाहता, साक्षीदार क्र. ३ हा भाऊ आहे, त्याने घटना घडताना प्रत्यक्ष पाहिलेली नाही. तसेच आरोपी घटनास्थळावर हजर होता किंवा नाही याबाबत देखील त्याच्या जबाबात तफावत दिसून येते. सदर साक्षीदार क्र. ३ व ४ यांना सदर घटना ही ऐकीव माहिती मिळालेली आहे व घटना घडल्यानंतर ते घटनास्थळी पोहोचले आहेत असे दिसून येते. त्यामुळे त्यांची साक्ष ही ऐकीव पूरावा म्हणून धरली जाईल व ती गुन्हा सिद्ध करण्यासाठी पोषक ठरणार नाही. तसेच दोन्ही साक्षीदार हे स्वारस्य असलेले साक्षीदार दिसून येतात.

१७. वरील सर्व पुराव्याचे अवलोकन केले असता, फिर्यादीने तिच्या फिर्यादीत केलेल्या कथनास पुरक साक्ष नोंदवलेली नाही. फिर्यादी व साक्षीदार क्र. ३ व ४ यांची साक्ष पाहता तिन्ही साक्षीदारांच्या पूराव्यात विसंगती दिसून येते. फिर्यादी हिची साक्ष पाहता तिने घटनाक्रम जो न्यायालयात साक्षीवर दिला तो घटनाक्रम निशाणी ०८ वरील जबाबाप्रमाणे दिसून येत नाही व त्यात विसंगती आहे. घटनास्थळ हे वर्दळीचे ठिकाण असून त्याठिकाणी घटना होताना कोणीच प्रत्यक्ष पाहिली नाही, तसेच साक्षीदार क्र. ५ यांनी देखील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नोंदवले नाहीत असे दिसून येते.

१८. त्यानंतर, अभियोग पक्षातर्फे पंच साक्षीदार हरेश प्रकाश पाटील (अ.सा.क्र.२) यांना तपासण्यात आले. त्यांनी त्यांच्या सरतपासात असे कथन केले आहे की, दिनांक २३.०२.२०२२ रोजी पोलिसांनी त्यांना टेननाका येथे पंच म्हणुन काम करण्यासाठी बोलावले होते. सदर ठिकाणी त्यांना कविता दास या महिलेने आम्हाला घटनास्थळ दाखवले. घटनास्थळ हे मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गाच्या बाजूला असलेली चहाची टपरी होती व सदर टपरी कविता दास ही चालवत होती. पोलिसांनी तेथे फिर्यादीकडे चौकशी केली व घटनास्थळाचा पंचनामा तयार केला. त्यानंतर सदर पंचनामा (निशाणी १२) त्यांना आणि दुसरे पंच रामु पाडेकर यांना वाचून दाखवला. सदर साक्षीदाराच्या उलटतपासात असे आले आहे की, फिर्यादीचा भाऊ रविंद्र धाडपी याने त्यांना पंचनाम्यावर सही करण्यासाठी बोलवले होते. तसेच त्यांना घटनेच्या चतुःसिमा विस्तृतपणे सांगता येणार नसल्याचे त्यांनी कथन केले आहे.

१९. त्यानंतर, अभियोग पक्षाने निशाणी २१ वर तपासी अधिकारी (साक्षीदार क्र.५) यांची साक्ष नोंदवली. त्यांच्या साक्षीनुसार त्यांच्याकडे सदर प्रकरणाचा तपास वर्ग करण्यात आला होता. त्यांनी त्यांच्या पुराव्यात फिर्यादीचे अवलोकन करून

घटनास्थळी जावून घटनास्थळाचा दोन पंच समक्ष घटनास्थळ पंचनामा (निशाणी १२) केला व तपासकामी साक्षीदारांचे जबाब नोंदवले. त्यांच्या सांगण्यानुसार साक्षीदार फिर्यादी कविता दास हिचा जबाब देखील तिच्या सांगण्याप्रमाणे नोंदवला. तसेच गुन्हा घडल्यावर सदर आरोपी हा पोलीस स्टेशनला आणला होता व त्यानुसार अटक पंचनामा करून आरोपीला अटक केले व तपासाअंती आरोपीने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे त्यांनी आरोपी विरुद्ध न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

२०. त्यांनी उलटतपासात कथन केले की, फिर्यादी चालवत असलेल्या टपरीच्या मालकीचे कागदपत्र त्यांनी दोषारोपपत्रासोबत दाखल केलेले नाहीत. त्यांनी हे मान्य केले की, त्यांना घटनेचा कोणताही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार मिळून आला नाही तसेच पंच फिर्यादीच्या ओळखीचे होते. त्यांनी पुढे कथन केले की, निशाणी १० वरील फोटो त्यांनी कोणत्या मोबाईलच्या मॉडेल मध्ये काढलेला आहे याचा उल्लेख दोषारोपपत्रात नाही. त्यांनी त्यांच्या उलटतपासात हे मान्य केले की, घटना घडताना प्रत्यक्षदर्शी साक्षीदार मिळून आला नव्हता. तसेच सदर घटना कोणी पाहिली याबाबत तपासात निष्पन्न झाले नाही. तसेच त्यांनी आरोपीचे निवेदन नोंदविले नाही.

२१. साक्षीदार क्र. २ व ५ यांची साक्ष पाहता, साक्षीदार क्र. २ हे पंच असून त्यांनी जरी पंचनामा सिद्ध केला असला तरी पंचनाम्यासाठी साक्षीदार क्र. ३ म्हणजेच फिर्यादीचा भाऊ यांनी त्यांना बोलवले असे त्यांच्या उलटतपासात म्हटले आहे. त्यांना घटनेच्या चतुःसिमा सांगता आल्या नाही. तसेच साक्षीदार क्र. ५ यांची साक्ष पाहता त्यांचा तपास हा औपचारिक स्वरूपाचा दिसून येतो. सदर तपासात छायाचित्रित केलेले छायाचित्र निशाणी १० सिद्ध करण्यास अभियोगपक्ष अपयशी ठरलेला आहे. पंच हे फिर्यादीच्या ओळखीचे होते हे त्यांनी मान्य केले तसेच त्यांना त्यांनी नोटीस दिली

नव्हती. सबब, वरील पुरावा पाहता असे कुठेच निष्पन्न होत नाही की, आरोपीने फिर्यादीचा हात पकडून जवळीक साधण्याचा प्रयत्न करून चुंबन घेण्याचा इशारा केला व तिला मिठी मारून विनयभंग करण्याच्या उद्येशाने तिच्या मनास लज्ञा उत्पन्न होईल असे कृत्य केले.

२२. उपरोक्त पुरावा, वकिलांचा युक्तीवाद व त्याप्रमाणे एकंदरीत कायदेशीर परिस्थीतीत या सर्वांची एकत्रितरित्या सांगड घालता फिर्यादी ही महत्वाची साक्षीदार असताना देखिल तिने तिच्या जबाबात व न्यायालयासमोर घेण्यात आलेल्या साक्षीमध्ये विसंगती दिसून येते. तसेच इतर साक्षीदारांची साक्ष देखील अभियोग पक्षास आरोपीविरूध्दचा गुन्हा शाबीत करण्याकरिता उपयुक्त ठरलेली दिसून येत नाही. त्यामुळे, उपरोक्त साक्षी पुराव्यांवरुन सदर आरोपीने फिर्यादीचा हात पकडून जवळीक साधण्याचा प्रयत्न करून तिचा विनयभंग करण्याच्या उद्येशाने तिच्या मनास लज्ञा उत्पन्न होईल असे केले तसेच तिला शिवीगाळ करून प्रक्षोभित केले याबाबी निर्विवादपणे व संशयापलीकडे सिध्द होत नसल्याने मी मुद्दा क्रमांक १ व २ चे उत्तर नकारर्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ३ करिता</u> –**

२३. वर चर्चिल्याप्रमाणे मुद्या क्र. १ व २ चे उत्तर नकारार्थी नोंदविल्यामुळे मुद्या क्र. ३ करिता खालील आदेश पारित करण्यात येतो.

**: आदेश :**

१. आरोपी रणधिर महेश ठाकूर यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) नुसार भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३५४ व ५०४ अन्वये शिक्षापात्र असलेल्या आरोपांतून निर्दोष

मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचा जामीन मुचलका रद्द करण्यात येतो.

३. आरोपी यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम ४३७-अ च्या पुर्ततेकामी सादर केलेले बंधपत्र सदर आदेशापासुन सहा महिन्याचे कालावधी पर्यंत ग्राह्य राहिल.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत)

PRIYANKA HARISH AHIRE
Digitally signed by PRIYANKA HARISH AHIRE
Date: 2026.07.14 15:48:33 +0530

दिनांक- १४.०७.२०२६ (पी. एच. अहिरे)

ठिकाण- पालघर न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, पालघर,

(न्यायालय क्रमांक ३)